| MHKO200000662024 | **नियमित दिवाणी दावा क्र.१५/२०२४ मधील निशाणी क्रमांक ५ खालील आदेश**<br>**सौ. सखुबाई पांडू वडिंगेकर**<br>**विरुध्द**<br>**श्री. रंगराव गणपती पाटील वगैरे** |
|---|---|

वादी यांनी सदरचा दावा वाटप, हक्कज्ञापन व कायम मनाई मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ व कलम १५१ अन्वये प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी दावा मिळकतीची विक्री, हस्तांतरण, तबदील करु नये अथवा त्यावर कर्ज बोजे निर्माण करु नयेत अशी दाव्याच्या अंतिम निकालापावेतो प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना तुर्तातुर्त मनाई ताकिद व्हावी अशी विनंती केली.

**<u>अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** –

०३. **<u>दावा मिळकतीचे वर्णन</u>** –

अ. मौजे माळापुडे, ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर हद्दीतील खालील वर्णनाची शेत जमीन मिळकती –

| गट क्र. | एकुण क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| २४७ | ०.१५.०० | ०–४९ |

यांसी चतु:सिमा –

पूर्वेस – देवस्थान जमीन
पश्चिमेस – नारायण रामू पाटील यांची जमीन
दक्षिणेस – आनंदा बापू पाटील यांची जमीन
उत्तरेस – केरबा ज्ञानू पाटील यांची जमीन

ब. गट नं.८० क्षेत्र हे.०.३७.००आर, आकार ५ रु.७५ पैसे या पैकी खाते नंबर ४०९ अन्वये प्रतिवादी नं.१ यांचे नावे ७/१२ पत्रकी नमुद असलेले क्षेत्र हे.०.०७.००आर, आकार रु.१.०९ पै. यासी चतु:सिमा –

| | |
|---|---|
| पूर्वेस | – कृष्णा शिवराम सुतार यांची जमीन |
| पश्चिमेस | – गुंडा हरी कांबळे यांची जमीन |
| दक्षिणेस | – भैरु सिदू कांबळे यांची जमीन |
| उत्तरेस | – गुंडा कोंडी कांबळे यांची जमीन |

येणेप्रमाणे शेत मिळकत व सदर शेत मिळकतीबाबत प्रतिवादी नं.१ व ४ यांचे दरम्यान झालेला अदलाबदली दस्त नं.४११/२००४ हा दि.३१/०३/२००४ रोजीचा दस्त हा दावेचा विषय असुन येथुन पुढे सोयीकरीता त्यांना संक्षिपणे **"दावा मिळकत'** संबोधणेत येत आहे.

**०४.** वादी यांचे असे कथन आहे की, वादी ही प्रतिवादी नं.१ ते ३ व ५ यांची सख्खी बहिण असुन वादी यांचे पूर्वहक्कदार वडिल श्री. गणपती बाबु पाटील यांचे पश्चात वादी तसेच प्रतिवादी नं.१ ते ३ व ५ हे त्यांचे सरळ कायदेशीर वारस आहेत. वादी व प्रतिवादी नं.१ ते ३ व ५ यांचे पूर्वहक्कदार वडील गणपती बाबू पाटील हे दि.०१/१२/१९९०रोजी मयत झाले असुन पूर्वहक्कदार आई मैनाबाई गणपती पाटील हया सन १९९८ मध्ये मयत झाल्या आहेत. दावा मिळकत गट नं.२४७ ही वादी नं.१ व २ तसेच प्रतिवादी नं.१ ते ३ व ५ यांचे वडिलार्जित मालकी वहिवाटीची मिळकत असुन त्याचे ७/१२ पत्रकी वादी यांचे पूर्वहक्कदार वडिल गणपती बाबू पाटील यांचे पश्चात डायरी नं.३४२ अन्वये व वारसा हक्काने वादी व प्रतिवादी नं.५ यांच्या नावाची नोंद इतर हक्कात झाली असुन प्रतिवादी नं.१ते ३ यांचे नावाची नोंद ७/१२ पत्रकी भोगवटदार सदरी झालेली आहे. दावा मिळकत गट नं.२४७ मध्ये वादी यांचा १/५ इतका सामाईक व अविभक्त असा हक्क अधिकार असुन वादी व

प्रतिवादी नं.१ ते ३ व ५ यांचे दरम्यान केव्हाही वाटप झालेले नव्हते व नाही. प्रतिवादी हे दावा मिळकत त्रयस्थ इसमांना विक्री, हस्तांतरण करण्याच्या प्रयत्नात असल्याचे वादींना दि.१०/११/२०२३ रोजी समजुन आले तेव्हा वादींनी प्रतिवादी नं.१ ते ३ यांचेकडे दावा मिळकत गट नं.२४७ मधील अविभक्त हिस्सा वाटप करुन मागणी केला असता प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी त्यास टाळाटाळ केली. दि.११/०१/२०२४ रोजी दावा मिळकतीचा ७/१२ उतारा काढला असता प्रतिवादी नं.१ यांनी डायरी नं.३४२ अन्वये त्यांचे नावे चुकीच्या आणेवारीची नोंद नमुद असल्याचा गैरफायदा घेऊन इतर अधिकारात वादी व प्रतिवादी नं.५ यांच्या नावाची नोंद नमुद असताना महसुल अधिका–यांशी संगणमत करुन इतर अधिकारातील नावे नमुद न करता तसेच वादी व प्रतिवादी नं.५ हे सदर दावा मिळकतीमध्ये सहहिस्सेदार असताना त्यांची संमती अथवा मान्यता न घेता दावा मिळकत गट नं.२४७ मधील हे.०.०५आर, आकार, ०.१६ ही शेतजमीन मिळकत प्रतिवादी नं.४ यांना बदली देऊन त्या बदल्यात प्रतिवादी नं.४ यांच्या मालकीची गट नं.८० मधील क्षेत्र हे.०.०७आर, आकार १ रु.०८ पै. ही शेतजमीन मिळकत प्रतिवादी नं.१ यांना बदली घेतले बाबत मे. दुय्यम निबंधक, शाहुवाडी यांचे कार्यालयात अदलाबदल दस्त नं.४११/२००४ अन्वये दि.३१/०३/२००४ रोजी दस्त नोंदवलेचे समजुन आले. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुतचा दावा वाटप, हक्कज्ञापन व कायम मनाईकरिता दाखल केला असुन अंतिम निकालास बराचसा दिनावधी लागणार असलेने दरम्यानचे काळाकरीता प्रतिवादी नं.१ ते ४ विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश पारित होणेची विनंती केली.

**०५.** प्रतिवादी नं.४ यांनी नि.क्र.१५ कडे मुळ दाव्यास कैफियत व तुर्तातुर्त मनाई अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत नोंदवली आहे की, अर्जातील मजकुर रचनात्मक, खोटा असुन प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही, ते त्याचा स्पष्ट शब्दात

इन्कार करतात. वादी यांनी सर्व मिळकती दाव्यामध्ये समाविष्ट केलेल्या नाहीत. दाव्याच्या शेवटी वादी यांनी प्रतिज्ञा केलेली नाही. ७/१२ पत्रकी ज्या लोकांच्या नावाचा उल्लेख आहे त्यांना या कामी पक्षकार केले नसल्यामुळे दाव्यास नॉन जॉईंडर ऑफ नेससरी पार्टी या तत्वाची बाधा येते. रंगराव गणपती पाटील यांनी प्रतिवादी महादेव सखाराम सुतार यांचे नावे साक्षीदारांचे समक्ष अदलाबदल दस्त ता.३१.०३.२००४ रोजी लिहुन दिलेला असुन सदर दस्ताची नोंदणी दुय्यम निबंधक कार्यालय, शाहुवाडी यांचे कार्यालयात दस्त क्रं.४११/२००४ ने झालेली आहे. सदर अदलाबदल दस्ताच्या आधारे रंगराव गणपती पाटील यांचे नांवे असलेली गट नं.२४७ क्षेत्र हे.०.१५ आर, आकार रु.०.४९ मधील ५ आणे ४ पै हिस्सेची जमीन म्हणजेच ०.०५ आर आकार रु.०.१५ पैसे ही जमीन प्रतिवादी यांना कायम हक्काने दिलेली आहे व त्या बदल्यात प्रतिवादी यांच्या नावे असलेली जमीन गट नं.८० क्षेत्र हे.०.३७ आर, आकार रु.५.७५ पैसे यापैकी ३ आणे हिस्सेची जमीन क्षेत्र हे.०.०७ आर आकार रुपये १.०८ पैसे ही मिळकत कायम हक्काने रंगराव गणपती पाटील यांना दिलेली आहे. सदर दस्ताच्या दिवशीच मिळकतीचा ताबा वादी व प्रतिवादी यांनी एकमेकांना दिलेला असुन दस्ताचे आधारे फेरफार मंजुर होवुन ७/१२ पत्रकी अंमल झालेला आहे. प्रतिवादी यांनी अदलाबदल दस्ताच्या आधारे मालकी हक्काने आलेल्या क्षेत्रामध्ये लाकूड कापण्याचे मशिन घातलेले असुन तसेच शेड मारलेले आहे. त्याचा ग्रामपंचायत मिळकत नं.२७२ असा आहे. तसेच उर्वरित क्षेत्रामध्ये नाचणा व भात व अन्य स्वरुपाची पिके घेत आहेत. सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी यांची उघडपणे अव्याहतपणे विना अडथळा कायदेशीर मालकी हक्काने कब्जा वहिवाट होती व आहे. सबब, तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर करणेची विनंती प्रतिवादी नं.४ यांनी केली.

**०६.** प्रतिवादी नं.१ ते ३ व ५ विरुध्द नि.क्र.१ कडील दि.२३.०४.२०२४ रोजी एकतर्फा आदेश पारित आहे.

**०७.** वादी व प्रतिवादी नं.४ च्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीचे कथन तसेच संचिकेत दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित होतात. सदर प्रश्नबिंदूचे निष्कर्ष कारणमिमांसेह खालील प्रमाणे –

| अ.क्र. | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीचे हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय? | नकारार्थी |
| ३. | उक्त अर्ज नामंजूर केल्यास वादी चे अपरिमित नुकसान होईल काय ? | नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | **नि.क्र.५ तुर्तातुर्त अर्ज नामंजुर करणेत येतो.** |

**०८.** वादीतर्फे दावा मिळकतीच्या संदर्भात नि.क्रं.३ व १७ सोबत दाखल केलेले कागदपपत्रे खालील प्रमाणे–

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | मौजे माळापुढे येथील गट नं.२४७ चा ७/१२ उतारा | १९.०१.२०२४ | डिजीटल प्रत |
| २. | मौजे माळापुडे येथील गट नं.८० चा ७/१२ उतारा | १९.०१.२०२४ | डिजीटल प्रत |
| ३. | अदला बदल दस्त क्र.४११/२००४ दस्ताची प्रत | ०४.०१.२०२४ | स.शि.नक्कल |
| ४. | डायरी नं.३४१ व ३४२ चे उता–याची प्रत | ०१.०१.२०२४ | स.शि.नक्कल |
| ५. | कै. मैनाबाई गणु पाटील यांचा मृत्यू दाखल्याची प्रत | २१.०७.२०२० | स.शि.नक्कल |
| ६. | मौ. माळापुडे, ता. शाहुवाडी, जि. | ०८.०१.२०२४ | झेरॉक्स प्रत |

| | | | |
|---|---|---|---|
| | कोल्हापूर येथील गट नं.२४७ चा सन २००२-२००३ ते २०१६-२०१७ पर्यंतचा ७/१२ उतारा प्रत | | |

**०९.** प्रतिवादीतर्फे दावा मिळकतीच्या संदर्भात नि.क्रं.१५ सोबत दाखल केलेले कागदपत्रे खालील प्रमाणे-

| **अ.क्रं.** | **कागदाचा तपशील** | **दिनांक** | **दाखल कागद** |
|---|---|---|---|
| १. | मालमत्ता क्र.२७२ चा उतारा | २३.०२.२०२४ | स.शि.न. |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>प्रश्नबिंदू क्र.१ करिता</u>** -

**१०.** प्रस्तुत वादी हे तात्पुरता मनाई आदेश मिळण्यासाठी प्रथमदर्शनी केस त्यांच्या हक्कात आहे का हे सिध्द करतात का हे पाहणे महत्वाचे ठरते. वादी यांनी नि.क्र.३ चे वर्णन यादी सोबत मौजे माळापुडे येथील गट नं.२४७ चा ७/१२ उतारा अभिलेखावर दाखल केला असुन त्यामध्ये प्रतिवादी नं.२ दगडू गणतपी पाटील, प्रतिवादी नं.३ नानू गणपती पाटील व प्रतिवादी नं.४ महादेव सखाराम सुतार यांची नांवे अनुक्रमे खाते क्र.७१,८१,४६८ अन्वये नोंद झाली असुन वादी सखुबाई वडिंगेकर ही प्रतिवादी नं.१ ते ३ व ५ यांची सख्खी बहिण आहे. सदर गट नं.२४७ वर वादी व प्रतिवादी नं.५ यांच्या नावाची नोंद नाही. त्यानंतर गट नं.८० च्या ७/१२ उता-यावर रंगराव गणपती पाटील प्रतिवादी नं.१, महादेव सखाराम सुतार प्रतिवादी नं.४ यांची नांवे नमुद आहेत. त्यानंतर वादी यांनी अदलाबदल दस्त क्रं.४११/२००४ ची अदलाबदल दस्ताची छायांकित प्रत अभिलेखावर दाखल केली असुन त्यामध्ये डायरी नं.३४२ अन्वये प्रतिवादी नं.१ यांनी चुकीच्या आणेवारीची नोंद नमुद असताना महसुल अधिका-यांशी संगणमत करुन इतर अधिकारातील नांवे नमुद न करता वादी व प्रतिवादी नं.५ हे सदर दावा मिळकतीचे सहहिस्सेदार

असताना त्यांची संमती न घेता दावा मिळकत १अ मधील ०.०५आर शेत जमीन मिळकत प्रतिवादी नं.४ बदली देवून त्याबदल्यात प्रतिवादी नं.४ यांच्या मालकीची गट नं.८० मधील क्षेत्र हे.०.०७आर आकार रु.१रु८पै. ही शेतजमीन मिळकत प्रतिवादी नं.१ यांना बदली घेतलेबाबत दुय्यम निबंधक, शाहुवाडी कार्यालयात आदलाबदल दस्त नं.४११/२००४ अन्वये दि.३१/०३/२००४ रोजी दस्त नोंदवलेचे समजुन आले. त्यानंतर सदर दस्ताची पाहणी केली असता प्रतिवादी नं.१ यांनी प्रतिवादी नं.४ यांचे लाभात व प्रतिवादी नं.४ यांनी प्रतिवादी नं.१ च्या लाभात जो अदलाबदल दसत करुन घेतला आहे तो शाबित होण्याकरिता आवश्यक पुरावा अभिलेखावर येणे क्रमप्राप्त आहे. त्यानंतर वादी यांनी मैनाबाई गणू पाटील ज्या की वादी व प्रतिवादी नं.१ ते ३ व ५ यांची पूर्वहक्कदार आई यांचा मृत्यूदाखला हजर केला आहे. वादी यांनी नि.क्र.१७ चे वर्णन यादी सोबत मौजे माळापुडे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील गट नं.२४७ चा सन २००२–२००३ ते २०१६–२०१७ पर्यंतचा ७/१२ उतारा छायांकित प्रतित अभिलेखावर दाखल केला असुन तो या ठिकाणी विचारात घेता येणार नाही.

**११.** प्रतिवादी नं.४ यांनी त्यांच्या कथनांच्यापृष्ठयार्थ नि.क्र.१५ चे वर्णन यादी सोबत मालमत्ता क्रं.२७२ चा ७/१२ उतारा अभिलेखावर दाखल केला असुन सदरचा उतारा हा मालकी हक्काचा नसुन तो कर आकारणीचा असल्याचे दिसुन येते. मुळात वादी व प्रतिवादी नं.१ ते ३ व ५ यांचे दरम्यान दावा मिळकतीचे अनुषंगाने आजपर्यंत कोणतेही वाटप झालेले नाही. वादी ही प्रतिवादी नं.१ ते ३ व ५ यांची सख्खी बहीण असल्याचे नातेसंबंध वादी व प्रतिवादी नं.४ हे मान्य करतात. अशा परिस्थितीमध्ये वाटप झाले नसताना सहहिस्सेदाराविरुध्द मनाई देणे न्यायोचित होणार नाही. करीता प्रश्नबिंदू क्रं.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>प्रश्नबिंदू २ व ३ करीता</u> –**

**१२.** वादीने प्रतिवादी विरुध्द प्रथमदर्शनी केस शाबित केलेली नाही. सबब, वादीच्या हक्काना दावा मिळकती संदर्भाने संरक्षीत करणे गरजेचे दिसत नाही. तसे न झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार नाही. सबब, न्यायाचा समतोल प्रतिवादी नं.१ ते ४ च्या बाजूने वादीच्या तुलनेत जास्त आहे. सबब, **प्रश्नबिंदू क्रं.२ व ३ नकारार्थी** नोंदवण्यात येत आहे.

**<u>प्रश्नबिंदू ४ करीता</u> –**

**१३.** प्रश्नबिंदू क्रं.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी असल्याने प्रश्नबिंदू क्र.४ चे निष्कर्षादाखल खालील आदेश पारित करण्यात येत आहे–

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नामंजूर करण्यात आला आहे.

२. उभय पक्षकारांनी आपापला खर्च सोसावा.

(खुल्या न्यायालयात घोषीत)

Digitally signed by VAISHALI AMOL LAVAND-KOKATE
Date: 2026.02.24 16:24:12 +0530

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

दि.२४.०२.२०२६.
कळे–खेरीवडे.